आदेश

श्रीमती जोस्पीन स्टिफन भोसले, आरोग्य सेवक महिला, यांचे अनाधिकृत गैरहजर कालावधीचा निर्णय घेणे बाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर

आरोग्य विभाग

जिल्हा परिषद आदेश क्रं.आरोग्य/कार्या 2/आस्था 4/250/2021

दिनांक 01/06/2021

वाचा :- 1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अहमदनगर यांचेकडील दोषारोप ज्ञापन क्र आरोग्य/कार्या 2/आस्था 4/796/2006 दिनांक 21/08/2006

2) वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र अळकुटी ता. पारनेर यांचेकडील पत्र क्रमांक वशि/आस्था /370/2006 दि. 11/09/2006

3) श्रीमती जोस्पीन स्टिफन भोसले, आरोग्य सेवक महिला यांचा दिनांक 06/09/2006 रोजीचा खुलासा

4) इकडील अंतीम कारणे दाखवा नोटीस क्रमांक आरोग्य/ कार्या 2/आस्था 4/ 406/2008 दिनांक 08/04/2008

5) श्रीमती जोस्पीन स्टिफन भोसले, आरोग्य सेवक महिला यांचा दिनांक 05/03/2008 रोजीचा खुलासा

6) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अहमदनगर यांचेकडील आदेश क्र आरोग्य/कार्या 2/आस्था 4/1123/2008 दि. 23/10/2008

7) वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र चासनळी ता. कोपरगाव यांचेकडील पत्र क्रमांक आरोग्य/आस्था /74/2021 दि. 19/03/2021

8) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 (3)

9) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 (6)

10) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक सेनिवे 1001/ 130/ सेवा - 4 दिनांक 20 जुन 2003

11) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील परिपत्रक क्रमांक अरजा-2016/ प्र.क्र.84/ सेवा-6 दिनांक 10 ऑक्टोबर 2017

ज्या अर्थी श्रीमती जोस्पीन स्टिफन भोसले, आरोग्य सेवक महिला, हया दिनांक 02/06/1988 ते 21/11/1991 अखेर एकुण 1268 दिवस अनाधिकृत गैरहजर राहुन गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा (वर्तणुक) 1967 चा नियम 3 चे उल्लंघन केल्याने संदर्भ क्रमांक 1 अन्वये त्यांचेवर दोषारोप ठेवण्यात आलेले होते. संदर्भ क्रमांक 2 अन्वये श्रीमती जोस्पीन स्टिफन भोसले यांना दोषारोप प्राप्त झालेची पोहच प्राप्त झालेली आहे. तसेच संदर्भ क्रमांक 3 अन्वये श्रीमती जोस्पीन स्टिफन भोसले यांनी दोषारोपाचा खुलासा सादर केलेला असुन दोषारोप मान्य केलेले आहेत. संदर्भ क्रमांक 4 अन्वये श्रीमती जोस्पीन स्टिफन भोसले, आरोग्य सेवक महिला यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 चे नियम 3 चे उल्लंघन केलेले असल्याने तुमच्या विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 चे नियम 4 (2) नुसार पुढील वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी थोपविणे ही शिक्षा नमुद करुन अंतीम कारणे

दाखवा नोटीस देण्यात आलेली होती. संदर्भ क्रमांक 5 अन्वये श्रीमती जोस्पीन स्टिफन भोसले यांनी खुलासा सादर केलेला असुन सर्व आरोप मान्य केलेले आहेत. संदर्भ क्रमांक 6 च्या आदेशान्वये त्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील नियम 4 (2) नुसार पुढील वार्षिक वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परीणाम होईल अशा रितीने एक वर्षासाठी बंद करणेची शिक्षा अंतीम करण्यात आलेली असुन सदर अनाधिकृत गैरहजेरीचा निर्णय घेणे आवश्यक आहे.

त्या अर्थी श्रीमती जोस्पीन स्टिफन भोसले, आरोग्य सेवक महिला यांचा दिनांक 02/06/1988 ते 21/11/1991 अखेर एकुण 1268 दिवस हा अनाधिकृत गैरहजर कालावधी महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय सेनिये/1001/130/सेवा-4 दिनांक 02 जून 2003 मधील परिशिष्ट - एक नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 मध्ये प्रत्योजित केलेले अधिकारा नुसार नियम क्रमांक 63 (6) मध्ये नमुद केलेनुसार सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ (सेवानिवृत्ती विषयक लाभासह) अकार्यदिन करण्यात येत आहे. सदर आदेशाची अमंलबजावणी तात्काळ करण्यात यावी व संबधीताचे मुळ सेवा पुस्तकात याची नोंद घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडे सादर करावा.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202106011000S8 असा आहे.

(राजेंद्र क्षीरसागर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्रीमती जोस्पीन स्टिफन भोसले, आरोग्य सेवक महिला, प्राथमिक आरोग्य केंद्र चासनळी ता. कोपरगाव द्वारा व प्रत :- वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र चासनळी ता. कोपरगाव

२/- सदर आदेशाची प्रत संबंधीत कर्मचा-यांस मिळाल्या बाबतची तारखेसह स्वाक्षरी घेवुन ती पोहच या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना माहितीस्तव सविनय सादर,
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, कोपरगाव

(राजेंद्र क्षीरसागर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर